'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Vol. 2 Issue. 2
ISSN :2348-7143 (Online)
April- June- 2015

# शिरपूर तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचा त्यांच्या अभ्यास सवयीच्या संदर्भात अभ्यास.

**प्रा. तुषार मधुकर माळी**
(एम.एड्. विभाग)
**आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय**
**शिरपूर, जि. धुळे महाराष्ट्र, भारत**

***सारांश-*** *प्रस्तुत संशोधनात कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचा त्यांच्या अभ्याससवयीच्या संदर्भात अभ्यास केला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला असून १६० विद्यार्थ्यांची सहेतुक नमुना निवड पद्धतीने न्यादर्श निवडला होता. विद्यार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षा मापन करण्यासाठी डॉ. व्ही. पी. शर्मा (रायपूर), अनुराधा गुप्ता (रायपूर) यांनी प्रमाणित केलेली शैक्षणिक महत्त्वाकांक्षा शोधिकेचा तर अभ्यास सवयी मापन करण्यासाठी डॉ. टी. प्रदीपकुमार यांची प्रमाणित अभ्याससवयी मापिकेचा (Study Habits Scale (SHS) अवलंब केला होता. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन,'t' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब केला आहे. प्रस्तुत संशोधनातून अनुकूल अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षा ही प्रतिकुल व तटस्थ अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा अधिक दिसून आली.*

**प्रस्तावना**

जगात व्यक्तीभेद दिसून येतात. प्रत्येकाची आवड आणि निवड ही वेगळी असते. यशापर्यंत पोहचण्याची पद्धत वेगळी असते. प्रत्येकाचा आपला एक दृष्टीकोन असतो, आपली विचार करण्याची एक वेगळी पद्धत असते. तसेच प्रत्येकाची आपली एक महत्त्वाकांक्षा असते. प्रत्येकाला आपल्या जीवनामध्ये काहीना काही करण्याची महत्त्वाकांक्षा मनामध्ये दबलेली असते. जसे कुणाला खेळामध्ये, तर कुणाला सांगितामध्ये, तर कुणाला विज्ञान क्षेत्रामध्ये, तर कुणाला शिक्षण क्षेत्रामध्ये करीअर घडविण्याची महत्त्वाकांक्षा असते. ही महत्त्वाकांक्षा शैक्षणिक विकासातूनच पुर्ण होणार असते. म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने आपली महत्त्वाकांक्षा तयार केलेली असते. आजकाल प्रत्येक पालकाला आपला मुलगा डॉक्टर किंवा इंजिनिअर व्हावासा वाटतो. प्रत्येक पालकाला आपल्या मुलाने ९०% वर गुण मिळवावे असे वाटते. अशी महत्त्वाकांक्षा असते परंतु त्यामागे संपादन अधिक महत्त्वाचे आणि जेव्हा आपण अभ्यास करतो तेव्हाच ते सफल होते म्हणून अभ्याससवयी चांगल्या असणे गरजेचे असते.

एखाद्या विषयाचे सखोल ज्ञान मिळवण्यापेक्षा काही विद्यार्थ्यांचा ठराविक प्रश्नांचाच अभ्यास करण्याची वृत्ती असते इतकेच नव्हे तर काही विद्यार्थी शिक्षकाने शिकवण्या अगोदर त्या पाठावरील प्रश्नोत्तरे पाठ करतात आणि लिहतात असेही आढळले. अभ्यासाच्या सवयीचा दोष दुर्लक्ष करण्यासारखा नाही हे मान्य करावे लागेल या प्रमाणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना अपेक्षेहून वेगळे प्रश्न आल्यास त्या प्रश्नांची उत्तरे सोडविणे कठीण होवून जाते. एवढेच नाही, तर त्या प्रश्नाची भाषा बदलल्यामुळेही त्यांचा गोंधळ होतो. कारण त्यांना विषयज्ञानाचे पुरेसे आकलन झालेले नसते काही वेळेस प्रश्नावलीची क्रमसंख्या भाषा बदल्यामुळे ही विद्यार्थी गोंधळून जातात येथे विद्यार्थ्यांचा अभ्याससवयी दोषी ठरतात हे स्पष्टपणे जाणवते. बरेच लोक म्हणतात आठ-आठ तास जरी विद्यार्थ्याने अभ्यास केला तर त्याचा अपेक्षित परिणाम विद्यार्थ्याला मिळत नाही. कारण त्यात त्यांची स्वत:ची इच्छा शक्ती मिळालेली नसते. त्यांच्या अभ्यासात काही तरी उणिव असू शकते. एखाद्या विषयाचा सखोल अभ्यास केल्यानंतर त्यांचे सिंहावलोकन वा पुनरावलोकन करावे. आजच्या ज्ञानसंपन्न युगात संगणकाव्दारे ज्ञान सहज प्राप्त होत आहे. अभ्यास सवयीमुळे विद्यार्थ्यांच्या संपादणुकीत वाढ तर होतेच परंतु त्यांच्या महत्त्वाकांक्षाही वाढतात. चांगल्या अभ्याससवयीमुळे वर्तमानपेपर, इंटरनेट तसेच इतर आवश्यक माहिती वाचनात आल्यामुळे त्यांना त्यांचे ध्येय ठरविण्यासाठीही मदत होतेच. चांगली महत्त्वकांक्षा वाढल्यामुळे विद्यार्थी आणखी आपला अभ्यास अधिक मन लावून करतो. म्हणून प्रस्तुत संशोधनात संशोधकाने शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचा विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयीच्या संदर्भात अभ्यास केला आहे.

**समस्याविधान**

शिरपूर तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचा त्यांच्या अभ्यास सवयीच्या संदर्भात अभ्यास करणे.

**संशोधनाची उद्दिष्टे -**

१. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयीचा अभ्यास करणे.
२. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकुल व प्रतिकुल अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचा तुलनात्मक अभ्यास करणे.
३. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकूल व तटस्थ अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचा तुलनात्मक अभ्यास करणे.
४. कनिष्ठ महाविद्यालयातील प्रतिकुल व तटस्थ अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**परिकल्पना**

१. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकुल व प्रतिकुल अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.
२. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकूल व तटस्थ अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.
३. कनिष्ठ महाविद्यालयातील प्रतिकुल व तटस्थ अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

**पद्धती**

प्रस्तुत संशोधनात संशोधकाला शिरपूर तालुक्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचा त्यांच्या अभ्याससवयीच्या संदर्भात सद्यस्थितीचा अभ्यास करावयाचा असल्याने वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला आहे.

RESEARCH JOURNEY

**जनसंख्या व न्यादर्श**

शिरपूर तालुक्यातील २००० कनिष्ठ महाविद्यालयातील (११ वी) विद्यार्थ्यांची जनसंख्या निश्चित केली. एकुण जनसंख्येच्या ०८ टक्के म्हणजे १६० विद्यार्थ्यांची न्यादर्श म्हणून निवड सहेतुक नमुना निवड पद्धतीने केली.

**संशोधनाची साधने**

कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा अभ्याससवयीचा अभ्यास करण्यासाठी डॉ. टी. प्रदीपकुमार यांची प्रमाणित अभ्याससवयी मापिकेचा (Study Habits Scale (SHS)) अवलंब केला होता. प्रस्तुत मापिकेत एकूण ३० विधाने होते. २४ होकारात्मक व ०६ नकारात्मक विधाने होती. तसेच विद्यार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षा जाणून घेण्यासाठी डॉ. व्ही. पी. शर्मा (रायपूर), अनुराधा गुप्ता (रायपूर) यांनी प्रमाणित केलेली विद्यार्थी महत्त्वाकांक्षा शोधिकेचा उपयोग केला आहे. प्रस्तुत शोधिकेत एकूण ०८ विधाने असून प्रत्येक विधानाला १० पर्याय दिलेले आहेत.

**संख्याशास्त्रीय परिमाणे**

प्रस्तुत संशोधनात संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी मध्यमान, प्रमाणविचलन, 't' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणाचा अवलंब केला आहे.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन -**

प्रस्तुत संशोधन पेपरांत प्रथम कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना डॉ. टी. प्रदीपकुमार यांची प्रमाणित अभ्याससवयी मापिका देण्यात आली. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या मापिकेला दिलेल्या प्रतिसादावरून खालील प्रमाणे विश्लेषण करण्यात आले.

ISSN :2348-7143 (Online)
April- June- 2015

**तक्ता क्र. ०१ कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची अभ्याससवयी**

| अभ्यास सवयी | विद्यार्थी |
|---|---|
| अनुकूल अभ्यास सवयी असलेले विद्यार्थी | ९० (५६%) |
| प्रतिकुल अभ्यास सवयी असलेले विद्यार्थी | ३१(२०%) |
| तटस्थ अभ्यास सवयी असलेले विद्यार्थी | ३९(२४%) |




## निरीक्षण

कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकूल अभ्याससवयी असलेले विद्यार्थी हे ५६ टक्के, प्रतिकुल अभ्यास सवयी असलेले २० टक्के तर तटस्थ अभ्यास सवयी असलेले २४ टक्के विद्यार्थी दिसून येतात.

**परिकल्पना परीक्षण**

**०१. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकुल व प्रतिकुल अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.**

| शैक्षणिक महत्त्वाकांक्षा | अनुकूल अभ्यास सवयी असलेले विद्यार्थी | प्रतिकुल अभ्यास सवयी असलेले विद्यार्थी |
|---|---|---|
| संख्या | ९० | ३१ |
| मध्यमान | ५०.८७ | ४३.७५ |
| प्रमाणविचलन | ४.५८ | ४.७९ |
| प्रमाणत्रुटी | ०.९७ | |
| नमुना 't' मूल्य | १.९८ | |
| प्राप्त 't' मूल्य | ७.१२ | |
| सार्थ | सार्थ | |
| त्याग /स्वीकार | त्याग | |




df = ११७ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य १.९८ क आहे. म्हणुन शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकुल व प्रतिकुल अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येतो. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकूल अभ्याससवयी असलेल्या विदयार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचे मध्यमान (५०.८७) हे प्रतिकुल अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचे मध्यमानापेक्षा (४३.७५) अधिक आहे. यावरून असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकूल अभ्यासवयी असलेल्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षा प्रतिकुल अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा अधिक दिसून येते.

**०२. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकूल व तटस्थ अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.**

| शैक्षणिक महत्त्वाकांक्षा | अनुकूल अभ्यास सवयी असलेले विद्यार्थी | तटस्थ अभ्यास सवयी असलेले विद्यार्थी |
|---|---|---|
| संख्या | ९० | ३९ |
| मध्यमान | ५०.८७ | ४४.७७ |
| प्रमाणविचलन | ४.५८ | ४.९१ |
| प्रमाणत्रुटी | ०.८४ | |
| नमुना 't' मूल्य | १.९८ | |
| प्राप्त 't' मूल्य | ६.७२ | |
| सार्थ | सार्थ | |
| त्याग /स्वीकार | त्याग | |




df = १२७ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य १.९८ आहे व प्राप्त 't' मूल्य ६.७२ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा अधिक आहे. म्हणुन शून्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकुल व तटस्थ अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येतो. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकूल अभ्याससवयी असलेल्या विदयार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचे मध्यमान (५०.८७) हे तटस्थ अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक महत्त्वाकांक्षेचे मध्यमानापेक्षा (४३.७७) अधिक आहे. यावरून असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकूल अभ्यासवयी असलेल्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षा तटस्थ अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांपेक्षा अधिक दिसून येते.

**०३.कनिष्ठ महाविद्यालयातील प्रतिकुल व तटस्थ अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.**

| शैक्षणिक महत्त्वाकांक्षा | प्रतिकुल अभ्यास सवयी असलेले विद्यार्थी | तटस्थ अभ्यास सवयी असलेले विद्यार्थी |
|---|---|---|
| संख्या | ३१ | ३९ |
| मध्यमान | ४३.७५ | ४४.७७ |
| प्रमाणविचलन | ४.७९ | ४.९१ |
| प्रमाणत्रुटी | १.३५ | |
| नमुना 't' मूल्य | २.०० | |
| प्राप्त 't' मूल्य | ०.८७ | |
| सार्थ | असार्थ | |
| त्याग /स्वीकार | स्वीकार | |



df = ६८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 't' मूल्य २.०० आहे व प्राप्त 't' मूल्य ०.८७ असून ते नमुना 't' मूल्यापेक्षा कमी आहे. म्हणुन शून्य परिकल्पनेचा स्वीकार करावा लागेल. यावरून असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील प्रतिकुल व तटस्थ अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही. मध्यमानातील फरक योगायोगाने आलेला आहे असे म्हणावे लागेल. यावरून असे दिसून येते की, कनिष्ठ महाविद्यालयातील प्रतिकुल व तटस्थ अभ्यासवयी असलेल्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वाकांक्षा सारखी दिसून येते.

**निष्कर्ष**

१. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकूल अभ्याससवयी असलेले विद्यार्थी हे ५६ टक्के, प्रतिकुल अभ्यास सवयी असलेले २० टक्के तर तटस्थ अभ्यास सवयी असलेले २४ टक्के विद्यार्थी दिसून येतात.
२. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकुल व प्रतिकुल अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येतो.
३. कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकुल व तटस्थ अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येतो.
४. कनिष्ठ महाविद्यालयातील प्रतिकुल व तटस्थ अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक महत्त्वाकांक्षेच्या मध्यमान गुणाकांत सार्थक फरक आढळून येत नाही.

**चर्चा**

कनिष्ठ महाविद्यालयातील अनुकूल अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक दिसून येते. व अनुकूल अभ्याससवयी असलेल्या विद्यार्थ्यांची महत्त्वाकांक्षा प्रतिकुल व तटस्थ विद्यार्थ्यांपेक्षा अधिक दिसून येते. यामुळे पालकांनी व शाळेत शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या अभ्याससवयी अधिक चांगल्या कराव्यात ज्यातुत विद्यार्थ्यांची शैक्षणिक महत्त्वकांक्षा अधिक वाढेल. घराचे वातावरण व शाळेतील वातावरण अभ्यासासाठी उपयुक्त व अनुकूल असले पाहिजे. विद्यार्थ्यांचे मन उल्हासीत व आनंदीत असले पाहिजे. अभ्यासक्रमाची काठिण्यपातळी विद्यार्थ्यांच्या क्षमता पाहून वाढवली पाहिजे. शाळेने अभ्यासवर्गाची सुरूवात केली पाहिजे.

**संदर्भसूची**

१. Cattell, R. B (2008) Psychological Testing, New Delhi: Srishti Book Distributors.
२. Chauhan, S.S. (1999). Advanced Educational Psychology, Vikas Publishing House, New Delhi.
३. Garrett, H. E (1985) Statistics in Psychology and Education, Bombay Vakils, Feiffer and Simons Ltd.
४. Aggarwal J.C. (1991). Educational & Vocational Guidance & Counselling. New Delhi: Doaba House.
५. भोसले, रमा अश्विनीकूमार आणि डोणे, उज्वला मधुकर शिक्षणातील बदलते विचार प्रवाह, प्रकाशन पुणे.
६. जोशी बी. आर. (२००७) सामाजिक शास्त्रातील संज्ञा सिध्दांताचा कोश (मानसशास्त्र) पुणे, डायमंड पब्लिकेशन्स प्रथम आवृत्ती २००७.
७. पंडित, ब. बि. आणि मोरे, लता. (२०१०). शिक्षणशास्त्र संशोधनात संख्याशास्त्रीय परीक्षिकांचा उपयोग. नागपूर : पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स.